# महाराष्ट्र विधानपरिषद

## चौथे (हिवाळी) अधिवेशन, २०२०

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील नगरपंचायतीच्या इमारत बांधकामास निधी मंजूर करण्याबाबत

**(१) ४१४ (१८-०३-२०२०) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील नव्याने निर्माण झालेल्या नगरपंचायतींना स्वतंत्र इमारत नसल्याने सदर इमारत बांधकामाकरीता विशेष निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २१ नोव्हेंबर, २०१८ रोजी लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नगरपंचायत इमारत बांधकामास निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-१२-२०२०) :** (१) होय, स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांना सादर केलेले दिनांक २१ नोव्हेंबर, २०१८ चे निवेदन प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.

(२) व (३) सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत निधी, प्रत्यक्ष वितरणासाठी उपलब्ध होणारा निधी व मागण्या यांचा विचार करुन निधी वितरण करण्यात येते.

---

## कामठी, नागपूर येथील होमसायन्स कन्ट्रोमेटच्या विद्यार्थ्यांच्या समस्यांबाबत

**(२) ५१३ (१८-०३-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामठी, नागपूर येथील होमसायन्स कन्ट्रोमेटच्या विद्यार्थ्यांना शाळेबाहेर बसावे लागल्याची तक्रार विद्यार्थी व पालकांनी मा.मुख्यमंत्री व मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक २४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड (०८-१२-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक २०/१२/२०१९ ला शाळेच्या बाहेर विद्यार्थ्यांना बसविण्यात आलेले नसून शाळेच्या पटांगणातच काही वेळ बसविण्यात आले होते.

(२) गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती कामठी यांनी उपरोक्त नमूद दिवशी शाळेला भेट देऊन शाळा प्रशासनाच्या मुख्याध्यापक व संचालक यांना सूचना देऊन सदर शाळेचे हस्तांतरण झालेले आहे. स्थलांतरणाची परवानगी मिळाली नसल्याने सदर कार्यवाही पूर्ण होईपर्यंत आणि या शैक्षणिक सत्रात सद्य:स्थितीत शाळा ज्या ठिकाणी आहे त्याच ठिकाणी सुरू ठेवण्याबाबत सूचना देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील न्यायालयात प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(३) १६०९ (१८-०३-२०२०) श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय न्यायिक आकडेवारीनुसार राज्यातील जिल्हा व सत्र न्यायालयात आणि इतर कनिष्ठ न्यायालयात सध्या सुमारे ३७ लाख ४६ हजार प्रकरणे प्रलंबित असल्याचे आढळून आले असून यापैकी सुमारे १४ हजार ३४४ प्रकरणे ३० वर्षापेक्षा जुनी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रलंबित प्रकरणांपैकी जेष्ठ नागरीकांची सुमारे २ लाख ९४ हजार ४३१ तर महिलांची सुमारे ३ लाख २३ हजार ३९८ प्रकरणे सुमारे पाच ते दहा वर्षांपासून प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोठ्या प्रमाणात प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे वर्षानुवर्षे नागरीकांना होणारा त्रास विचारात घेता याबाबत शासनाकडून आढावा घेण्यात आला आहे काय, त्यात साधारणत: काय आढळून आले आहे व तद्नुसार सदर प्रकरणे निकाली काढण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०२-१२-२०२०) :** (१) दिनांक ३१/०३/२०२० रोजी प्रलंबित प्रकरणांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे:-

| वर्षे | दिवाणी | फौजदारी | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण प्रलंबित प्रकरणे | १२,५२,२०८ | २६,७९,२०८ | ३९,३१,४१६ |
| ३० वर्षापेक्षा जास्त प्रलंबित प्रकरणे | २,१५० | १७,८७० | २०,०२० |

(२) दिनांक ३१/०३/२०२० रोजी प्रलंबित प्रकरणांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे :-

१) जेष्ठ नागरिकांची एकूण प्रलंबित प्रकरणे :-

| सुमारे पाच ते दहा वर्षांपासून प्रलंबित प्रकरणे | एकूण प्रलंबित प्रकरणे |
|---|---|
| १२,३६५ | ६५,३३३ |

२) महिलांची एकूण प्रलंबित प्रकरणे :-

| सुमारे पाच ते दहा वर्षांपासून प्रलंबित प्रकरणे | एकूण प्रलंबित प्रकरणे |
|---|---|
| १०,०९१ | ६४,७०७ |

(३) (अ) न्यायसंस्था स्वायत्त असल्याने आढावा घेण्यात आलेला नाही. तथापि, प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढली जावीत या उद्देशाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे शिफारशीने शासनास सादर होणाऱ्या न्यायालय निर्मितीच्या प्रस्तावावर शासनाकडून सकारात्मकदृष्ट्या कार्यवाही करण्यात येते.

(ब) मा.उच्च न्यायालयाने महिला, बालके, ज्येष्ठ नागरिक यांचेवरील अत्याचाराचे खटले प्राथम्याने निकाली काढण्याबाबत वेळोवेळी अधिनस्थ कार्यालयाना निर्देश दिलेले आहेत.

(क) दिनांक ३/०३/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये अपंग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक व समाजातील दुर्लक्षित घटक यांच्यासाठी राज्यात ११ ठिकाणी विशेष न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत.

(ड) दिनांक १६/०८/१९९६, दिनांक ६/०५/१९९८, दिनांक ३/११/२००७ व दिनांक १७/०१/२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे त्वरेने निकाली काढण्यासाठी एकूण २७ विशेष न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत.

(इ) दिनांक २०/०७/२०१६, दिनांक १३/१०/२०१६ व दिनांक १८/०८/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील कौटुंबिक वादाचे खटले निकाली काढण्याकरीता १४ व्या वित्त आयोगांतर्गत १४ कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत.

(फ) दिनांक ४/०३/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये केंद्र शासनाच्या “राष्ट्रीय महिला सुरक्षा अभियान” अंतर्गत महिला व बालक अंतर्भूत असलेली बलात्कार व पोक्सो कायद्यांतर्गतची प्रलंबित प्रकरणे त्वरित निकाली काढण्याकरीता राज्यात १ वर्षाच्या कालावधीकरीता १३८ विशेष जलदगती न्यायालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## मुंगसरे (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांचे पीक कर्ज माफ करण्याबाबत

**(४) १८३३ (१८-०३-२०२०) श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंगसरे (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील सुमन पवार या मृत शेतकऱ्याच्या पत्नीला शेतीचे पीक कर्ज थकवले म्हणून बचत खात्यात पैसे असूनही चिखली बँक ऑफ महाराष्ट्राने पैसे देण्यास मनाई केली असल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पतीच्या मृत्यूचे प्रमाणपत्र जोडल्यानंतरही नाव कमी न करता कर्ज तुमच्या नावावर घ्यावे असे बँक अधिकाऱ्यांनी मृत शेतकऱ्याच्या पत्नीला सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मृत शेतकऱ्यांचे पीक कर्ज माफ करुन शेतकऱ्याच्या पत्नीला बचत खात्यातील पैसे बँकेकडून देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०३-१२-२०२०) :** (१) व (२) नाही.

(३) श्रीमती सुमन तुकाराम पवार यांचे संयुक्त बचत खात्यात दिनांक ०४/०१/२०२० रोजी रुपये ६५६०/- अनुदान जमा करण्यात आले होते. श्रीमती पवार यांनी पतीचे मृत्यूपत्र दिल्यानंतर दिनांक १७/०१/२०२० रोजी बचत खात्यातील रुपये ६५००/- रक्कम अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अकरावी-बारावीच्या अभ्यासक्रमात बदल केल्याबाबत

**(५) २३७८ (१८-०३-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी या वर्षापासून सुरु केलेल्या पर्यावरण, आरोग्य व जलसुरक्षा विषयात विद्यार्थ्यांना 'ड' ग्रेड मिळाल्यास त्यांना अनुत्तीर्ण ठरविण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने माहे जानेवारी, २०२० च्या दुसऱ्या आठवड्यात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय शिक्षण विभागाने यावर्षी अकरावीचा नवीन अभ्यासक्रम आणला असून नव्या अभ्यासक्रमानुसार अध्ययन पध्दतीतही अनेक बदल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अभ्यासक्रमात कोणकोणते बदल करण्यात आले आहेत, तसेच अभ्यासक्रमात बदल करण्याची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड (०८-१२-२०२०) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सदर शासन निर्णय दिनांक ०८/०८/२०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. तसेच शुध्दिपत्रक दिनांक ११ नोव्हेंबर, २०१९ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

इयत्ता ११ वी चा या शैक्षणिक वर्षापासून अभ्यासक्रम बदललेला नसून सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षापासून बदललेला आहे. अध्ययन पध्दतीत अनेक बदल करण्यात आले आहेत.

(३) नव्याने समाविष्ट केलेले विषय :

**गट अ :**

१. आधुनिक परकीय भाषा व साहित्य : स्पॅनिश, चिनी

२. अभिजात भाषा व साहित्य : महाराष्ट्री प्राकृत

**गट ब :** इयत्ता ११ वी

१. बालविकास

२. वस्त्रशास्त्र

<u>इयत्ता १२ वी</u>

१. गृहव्यवस्थापन

२. अन्नशास्त्र

**वगळण्यात / बदल करण्यात आलेले विषय :**

१. अवेस्ता पहलवी,

२. सामान्य ज्ञान,

३. स्टेनोग्राफी,

४. मराठी साहित्य,

५. हिंदी उपयोजित,

६. इंग्रजी साहित्य,

७. संस्कृत,

८. माहिती तंत्रज्ञान,

९. कलेचा इतिहास व रसग्रहण

१०. भारतीय संगीताचा इतिहास व विकास.

**सर्वसाधारण कारणे -**

१. नवीन विचारप्रवाह, विविध स्पर्धा परीक्षा व भविष्यातील संधीमध्ये स्वत:स पात्र करून घेण्यासाठी काही विषयांचा नव्याने समावेश करण्यात आलेला आहे.

२. परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या शून्य असल्याने काही विषय वगळण्यात आले आहेत व विषयांची पुनरावृत्ती होऊ नये, म्हणून विषयांचे एकत्रिकरण करण्यात आले आहे.

---

## वडोदबाजार (जि.औरंगाबाद) येथील तलाठी कार्यालयातील यादया मराठी भाषेत प्रसिध्द करण्याबाबत

**(६) २४३९ (१८-०३-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान किसान योजनेंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांनी आधार नंबर बँक खात्याशी लिंक करावे यासाठी वडोदबाजार (जि.औरंगाबाद) तलाठी कार्यालयाने प्रसिध्द केलेल्या इंग्रजी भाषेतील यादीतील अक्षरे अतिशय लहान असल्याने वाचता येणे शक्य नाही तसेच शेतकऱ्यांना इंग्रजी भाषेचे ज्ञान नसल्याने यादी वाचणे शेतकऱ्यांना गैरसोयीचे होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तलाठी कार्यालयातून प्रसिध्द करण्यात येणाऱ्या याद्या मराठी भाषेत प्रसिध्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०४-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेंतर्गत औरंगाबाद जिल्ह्यातील मौजे वडोदबाजार गावामधील ज्या लाभार्थ्यांची आधार पडताळणी झालेली नव्हती अशा २०६ लाभार्थ्यांची इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषेमधील वाचनीय यादी माहे जानेवारी, २०२० मध्ये तलाठी कार्यालयाकडून प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर यादी मराठी व इंग्रजी दोन्ही भाषेमध्ये असल्याने शेतकऱ्यांची गैरसोय झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विद्‌यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत

**(७) २५३८ (१८-०३-२०२०) श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक ४६८६१ ला दिनांक २७ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विद्‌यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी पहिली ते सातवीपर्यंत सर्व विषयांचे एकच पुस्तक तयार करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड (०८-१२-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

एक पुस्तक तयार करण्यात येणार नसून तीन पुस्तके तयार करण्यात येत आहे.
(२) इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी च्या सर्व पुस्तकांचे एकत्रिकरण करून त्याचे चार महिन्याचा अभ्यासक्रम एका पुस्तिकेत या प्रमाणे तीन भाग करण्यात येत आहे. एकावेळेस एकच भाग विद्यार्थ्यांनी शाळेत घेवून जावयाचे आहे. याची अंमलबजावणी पथदर्शी स्वरूपात सन २०२०-२०२१ मध्ये करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौ.भादाणे व मौ.देहरी (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील जमिनींची गैरप्रकारे विक्री केल्याबाबत

**(८) ३००८ (२९-०५-२०२०) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ.भादाणे व मौ.देहरी (ता.मुरबाड, जि.ठाणे) या गावातील जमिनींचे बनावट कागदपत्रे बनवून जमिनी परस्पर विकण्यात आल्याचा प्रकार माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला असून याबाबत मुरबाड पोलीस ठाण्यात वेगवेगळया गुन्हयांची नोंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देहरी (ता.मुरबाड) हद्दीत सर्व्हे क्रमांक २९/९ मध्ये वीस गुंठे इतकी वडिलोपार्जित मिळकत रघुनाथ देशमुख यांची असून खालील जुवारी या इसमाने बनावट ओळखपत्रे व कागदपत्र तयार करुन जमीन परस्पर विक्री केल्याप्रकरणी रघुनाथ देशमुख यांनी मुरबाड पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बनावट कागदपत्रांच्या आधारे मूळ जमीन मालकाची जमीन विक्री करुन फसवणूक केल्याप्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (०९-१२-२०२०) :** (१) व (२) होय.

(३) या प्रकरणी आरोपी यांच्याविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले असून मुरबाड येथील पोलीस ठाण्यात देहरी येथील जमिनीची परस्पर विक्री केल्याप्रकरणी गु.र.नं.३१/२०२० दाखल गुन्ह्याचा तपास चालू आहे. तसेच भादाणे येथील जमिनीची परस्पर विक्री केल्याप्रकरणी गु.र.नं.२१४/२०२० दाखल गुन्ह्यातील ११ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप सादर करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरात झोपडपट्टी पुनर्वसन योजना (एस.आर.ए.) प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(९) ३१९४ (०३-०६-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत (एस.आर.ए.) गत २४ वर्षात सरासरी ८५०० च्या दराने फक्त ३ लाख ६ हजार झोपडपट्टीवासियांना घरे हस्तांतरित केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील कोरोनाचे संकट दाटीवाटीच्या झोपडपट्ट्यांमुळे तीव्र होत असल्याची टीका नागरिकांकडून होत असून मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकासाचा प्रश्न ऐरणीवर आला असल्याची माहिती माहे एप्रिल, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मुंबईतील झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जितेंद्र आव्हाड (०७-१२-२०२०) :** (१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे आजमितीस ५०७४४४ पुनर्वसन सदनिकांना मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यापैकी २१०५३६ सदनिका झोपडपट्टीधारकांना हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित सदनिकांचे काम चालू आहे.

(२) मुंबईतील कोरोना या साथीचे संकट असताना सुध्दा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पूर्ण गतीने कार्यरत असून झोपडपट्टी पुनर्वसन योजना गतीने पूर्ण करण्याकरीता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे व शासनातर्फे विविध प्रकारच्या उपाययोजना केल्या जात आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अपर जिल्हाधिकारी, रायगड यांनी सिडकोच्या भूखंड वाटपात गैरव्यवहार केल्याबाबत

**(१०) ३५५७ (०३-०६-२०२०) श्री.सदाशिव खोत, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोने वाघिवली गावातील भूसंपादना बदली बेलापूर सेक्टर ३० येथे वितरित केलेल्या ५३२०० चौ.मी. चा रुपये ८०० कोटींचा भूखंड साडे बारा टक्के योजनेंतर्गत वाटप करता येणार नसल्याचा उपविभागीय अधिकारी, पनवेल यांनी माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान अहवाल देऊनही त्याबाबत अपर जिल्हाधिकारी, रायगड यांनी कोणतीही कारवाई केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी विभागीय आयुक्त, कोकण यांच्याकडून मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी अहवाल मागविला होता, सदर प्रकरणाचा अहवाल शासनाकडे प्राप्त झाला आहे काय, अहवाल प्राप्त झाला असल्यास संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(३) असल्यास, ओवे व खारघर येथील १४ एकर जमिनीचा भूखंड अपर जिल्हाधिकारी, रायगड यांनी कोयना प्रकल्पग्रस्तांना कोणत्या निकषांवर वाटप केला आहे, अपर जिल्हाधिकारी, रायगड यांनी त्यांच्या कार्यकाळात किती भूखंडाचे वाटप केले आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अपर जिल्हाधिकारी, रायगड यांच्या कार्यकाळात वाटप केलेल्या भूखंडाची चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०९-१२-२०२०) :** (१) व (२) प्रस्तुत प्रकरणी उपविभागीय अधिकारी, पनवेल यांनी मौजे वाघिवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील जमिनीबाबत दिनांक ०६/१२/२०१८ व दिनांक १५/०६/२०१९ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, रायगड यांना सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, रायगड यांनी विभागीय आयुक्त, कोकण यांना दिनांक २९/०६/२०२० रोजी अहवाल सादर केला आहे. विभागीय आयुक्त, कोकण यांचेकडून शासनास अहवाल अद्याप प्राप्त झाला नाही.

(३) महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९७६, १९८६ व १९९९ मधील तरतूदीनुसार पर्यायी जमिनीचे वाटप केले जाते. सध्याचे अपर जिल्हाधिकारी, रायगड यांचे कार्यकाळात पनवेल तालुक्यात २१ व खालापूर

तालुक्यात ११ अशी एकूण ३२ पर्यायी जमीन वाटप केली आहे. त्यापैकी पनवेल तालुक्यातील १८ पर्यायी जमीन वाटपाचे विविध कारणास्तव आदेश रद्द करण्यात आले आहेत.

(४) कोयना प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात आलेल्या जमिनीबाबतची चौकशी करण्यासाठी सेवानिवृत्त न्यायाधिश, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांची एक सदस्यीय चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर समितीने नगर विकास विभागास अहवाल सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी जिल्हा रुग्णालयामध्ये बोगस अपंग प्रमाणपत्र वितरित केल्याबाबत

**(११) ३५५९ (२९-०५-२०२०) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा रुग्णालयामध्ये बोगस अपंग प्रमाणपत्र वितरित केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या लाभार्थ्यांला तीन वर्षापूर्वी अपंग प्रमाणपत्र नाकारले, त्या लाभार्थ्यांना वयाच्या ६३ व्या वर्षी ४० टक्के दिव्यांगत्व प्राप्त झाल्याचे प्रमाणपत्र दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्रिसदस्यीय समितीने प्रमाणपत्र वितरित करणे आवश्यक असताना दोनच सदस्यांनी ८५ प्रमाणपत्र वितरित केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०४-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) त्रिस्तरीय समितीकडून प्रमाणपत्र वितरित केले जाते.

मात्र संबंधित प्रमाणपत्र वितरित केले त्यादिवशी एकच अस्थिव्यंग तज्ञ रूग्णालयात असल्याने व तेच अध्यक्ष असल्याने विशेषज्ञ व अध्यक्ष म्हणून त्यांनी कामकाज पाहिले व त्यांची एकच स्वाक्षरी केली गेली. त्यामुळे प्रमाणपत्रावर दोन सदस्य दिसून येतात.

(४) जिल्हाधिकारी, परभणी यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली असून कोणत्याही प्रकारची अनियमितता केलेली नाही, असे चौकशीत दिसून आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बोईसर (ता.जि.पालघर) मधील खाजगी वित्तीय संस्था व बांधकाम व्यावसायिकांनी ग्राहकांची फसवणूक केल्याबाबत

**(१२) ३५७९ (३१-०५-२०२०) श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ६२ ला दिनांक १२ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (ता.जि.पालघर) मधील खाजगी वित्तीय संस्था व बांधकाम व्यावसायिकांनी पंतप्रधान आवास योजनेमध्ये ४५०० ग्राहकांची फसवणूक करुन रुपये ४० कोटींच्या सबसिडीचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी घरमालकांनी दिनांक ३ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास बोईसर एमआयडीसी पोलीस ठाण्यावर मोर्चा काढून गुन्हा नोंदविला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी बोईसर पोलीस ठाण्यामध्ये फसवणूक झालेबाबत प्राप्त तक्रार अर्जानुसार अर्थिक गुन्हे शाखा, पालघर यांचेकडून सुरु असलेली चौकशीची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (०९-१२-२०२०) :** (१) बोईसर येथील आय.आय.एफ.एल. होम फायनान्स लि. व उतर खाजगी वित्तीय संस्था व बांधकाम व्यावसायिकांनी पंतप्रधान आवास योजनेच्या नावाखाली फसवणूक केल्याबद्दल अर्जदार सौ.सुवर्णा जयंत मोहिते व श्री.जयंत नामदेन मोहिते यांच्यातर्फे गजानन नामदेव मोहिते यांनी दिनांक १३/१०/२०१९ रोजी बोईसर पोलीस ठाणे येथे तक्रारदार व बोईसर परिसरातील बऱ्याच सदनिकाधारकांची फसवणूक झाल्याबाबत अर्ज दिलेला आहे. याबाबत गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

(२) व (३) होय.

तक्रारी अर्जाची चौकशी करण्यात आलेली असून चौकशी पूर्ण झालेली आहे. मा.संचालक, गृहनिर्माण व शहरी कामकाज मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडील पत्र क्र.०-१७०२४/२१९/२०१९-HFA-IV-UD/e-९०७७५९५, दिनांक १३/१२/२०१९ नुसार पंतप्रधान आवास योजनेचा लाभ देताना ग्राहकांना सबसिडी कर्जात समाविष्ट करण्यात आलेली आहे. सदरची बाब यातील अर्जदार श्री.गजानन नामदेव मोहिते यांना अवगत आहे. बोईसर येथील ग्राहकांची सबसिडी कर्जात समाविष्ट करण्यात आल्याने अर्जदार यांचे समाधान झाल्याने, त्यांची कोणाविरुध्द तक्रार नसल्याबाबत अर्जदार श्री.गजानन नामदेव मोहिते यांचा दिनांक १३/१०/२०१९ रोजी बोईसर पोलीस ठाणे येथे दिलेला तक्रारी अर्ज जा.क्र.३८४/२०२०, दिनांक ०९/०३/२०२० अन्वये दप्तरी दाखल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील शिवडी उड्डाणपुलाचे प्रलंबित काम पूर्ण करण्याबाबत

**(१३) ३८९९ (१४-०९-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शिवडी उड्डाणपुलाच्या कामाची माहे जून, २०२० पर्यंत सद्य:स्थिती काय आहे,

(२) तसेच टाळेबंदी दरम्यान प्रलंबित उड्डाण पुलाचे काम कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-१२-२०२०) :** (१), (२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे शिवडी ते वरळी उन्नतमार्ग प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. सदर प्रकल्पास सागरी किनारा नियमनविषयक मंजूरी आवश्यक असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथॉरिटीकडे प्राधिकरणामार्फत सादर करण्यात आला आहे. उक्त मंजूरी प्राप्त झाल्यानंतर कार्यारंभ आदेश देण्याचे प्राधिकरणामार्फत नियोजित आहे. सदर प्रकल्पाचे काम ३ वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## राज्यातील मच्छिमारांच्या डिझेल परताव्याची थकित रक्कम अदा करण्याबाबत

**(१४) ४००५ (१५-०७-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या मत्स्य विभागाने मत्स्यव्यावसायिकांच्या डिझेल परताव्यासाठी मत्स्यविकास क्र.१११९/प्र.क्र.३०८/पदुम-१४, सन २०१७ या वार्षिक १८७ कोटी मंजूर करण्यात येऊनही डिझेल परताव्याची रक्कम मच्छिमांरा मिळाली नसल्याने मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक मच्छिमार संस्थांनी याबाबत संताप व्यक्त केल्याचे माहे मे, २०२० च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यात माहे एप्रिल, २०१९ मध्ये लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराकरीता विद्यमान मा.मुख्यमंत्री आले असताना पालघर जिल्ह्यातील मच्छिमारांनी विद्यमान मा.मुख्यमंत्र्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन डिझेल परताव्याची थकित असलेली रुपये ७ कोटी ४० लाख देणी देण्याबाबत एक निवेदन सादर केले होते, तसेच पालघर जिल्ह्यातील मच्छिमार प्रतिनिधींनी पालघरच्या ठाणे जिल्हा मच्छिमार संघाच्या कार्यालयात भेट घेऊन डिझेल परताव्याच्या थकित रक्कमेच्या मागणीसह अनेक प्रलंबित प्रश्नांवर उपाययोजना करण्याची मागणी केली होती, तद्नंतर १ वर्षाचा कालावधी होऊनही डिझेल परताव्याची थकित देणी शासनाकडून देण्यात आली नसल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, डिझेल परताव्याच्या मागणीबाबत दिनांक १ मे, २०२० रोजी ई-मेलव्दारे मा.मुख्यमंत्री महोदय व मा.मत्स्यविकास मंत्री महोदय यांना ई-मेलव्दारे निवेदन सादर करण्यात आले आहे तसेच, मा.पालकमंत्री, पालघर यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान डिझेलचा परतावा मिळणेकरीता निवेदनाव्दारे मागणी करण्यात येवूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मच्छिमार सहकारी संस्थांना/मच्छिमारांच्या डिझेल परताव्याची थकित रक्कम अदा करण्याबाबत तसेच अन्य मागण्यासंदर्भांत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (०७-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

निधीच्या उपलब्धतेनुसार मागील चार वर्षांमध्ये जिल्हानिहाय उपलब्ध करुन दिलेल्या निधीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा | वर्ष निहाय निधी वितरणाचा तपशिल (रुपये कोटीत) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | पालघर | ६.२५ | १.७५ | ४.३० | ०.९८ |
| २ | ठाणे | ४.५६ | १.७५ | ३.३० | ०.८४ |
| ३ | मुंबई-उपनगर | १९.२८ | १४.२५ | २१.७० | ०.०० |
| ४ | मुंबई-शहर | १७.३८ | १३.२५ | २०.८९ | ०.०० |
| ५ | रायगड | १८.८६ | ११.५० | १८.२५ | ६.४९ |
| ६ | रत्नागिरी | १४.९३ | ९.०० | १६.३५ | ६.१२ |
| ७ | सिंधुदुर्ग | ३.७४ | २.५० | ५.८६ | ४.९२ |
| एकूण | | ८५.०० | ५४.०० | ९०.६५ | १९.३५ |

(२) पालघर जिल्ह्यासाठी सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ या आर्थिक वर्षामध्ये एकूण रुपये ०५.२८ कोटी इतका निधी डिझेल तेलावरील मुल्यवर्धीत कर परतावा मंजूरीसाठी उपलब्ध करुन दिलेला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हानिहाय प्रलंबित देयकांच्या प्रमाणात निधीचे वितरण करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रीयकृत बँकांनी कर्जासाठी जादा कागदपत्राची मागणी करुन शेतकऱ्यांची अडवणूक केल्याबाबत

**(१५) ४२४० (१४-०९-२०२०) श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना कर्जासाठी राष्ट्रीयकृत बँकांकडून माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान विविध १३ प्रकारच्या कागदपत्रांची मागणी केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बँक एका सात बारावर कर्ज वाटप करते परंतु राष्ट्रीयकृत बँकांकडून विविध १३ प्रकारच्या कागदपत्रांची मागणी केल्याने शेतकऱ्यांना बँकेच्या वारंवार फेऱ्या माराव्या लागतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, १ लाख ६० हजार रुपयांच्या कर्जासाठी केवळ सातबारा आठ अ आणि नकाशा यांची गरज असून देखील शेतकऱ्यांना कागदपत्रांच्या आड पीक कर्जापासून वंचित ठेवण्याचा बँक व शासनाचा हेतू आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशा बँकांवर नियंत्रण ठेवून शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०३-१२-२०२०) :** (१) व (२) नाही.
(३) नाही. रुपये १ लाख ६० हजार पीक कर्जापर्यंत गहाण ठेवण्याची आवश्यकता नसून राष्ट्रीयकृत बँकांमार्फत पीक कर्ज वाटपासाठी शेतकऱ्यांकडून खालील कागदपत्रे मागविण्यात येतात.

१. शेतीचा ७/१२.
२. नमुना ८अ.
३. फेरफार.
४. नकाशा.
५. आधार कार्डची छायाप्रत.
६. रेशनकार्ड.
७. स्टँपवर प्रतिज्ञापत्र.
८. नवीन सभासद असल्यास नो ड्युज प्रमाणपत्र.

यवतमाळ जिल्ह्यासाठी खरीप, २०२० साठी २१८२.५२ कोटीचा लक्षांक देण्यात आला असून माहे जून, २०२० अखेर १.१६ लाख खातेदार शेतकऱ्यांना रुपये ८९२.६२ कोटीचे (लक्षांकाच्या ४० टक्के) पीक कर्ज वाटप करण्यात आले. सद्य:स्थितीत २.०१ लाख खातेदार शेतकऱ्यांना रुपये १५७६.८६ कोटीचे (लक्षांकाच्या ७० टक्के) पीक कर्ज वाटप करण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर कारवाई करण्याबाबत

**(१६) ४४०० (१७-०७-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्ज माफी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले परंतु कोरोना महामारीमुळे कर्जाची रक्कम बँकेच्या खात्यात वर्ग करण्यास पाच महिने उशीर झाल्यामुळे शासनाने सर्व बँकांना व्याजाची रक्कम आम्ही भरू, शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज द्यावे असे स्पष्टपणे आदेशित केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दिनांक १५ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास ठराव घेऊन शेतकऱ्यांकडून व्याजाची वसुली सुरू केल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०४-१२-२०२०) :** (१) व (२) होय.

(३) शासनाने दिनांक १७/०१/२०२० च्या आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अ मधील अधिकारांचा वापर करुन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व प्राथमिक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ या योजनेंतर्गत कर्ज खात्यामधील थकित रकमेवर योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंत व्याजाची आकारणी न करणेबाबत निर्देशित केले आहे. सदरच्या निदेशाचे पालन करण्याबाबत दिनांक ०१/०६/२०२० रोजीच्या पत्राने सहकार आयुक्तांनी बँकेस कळविले आहे. तसेच विभागीय सहनिबंधक, औरंगाबाद यांनी दिनांक २२/०१/२०२०, १७/०६/२०२० व २३/०६/२०२० च्या पत्राने सदर सुचनांचे पालन करणेबाबत बँकेस कळविले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शालेय शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील
## विविध रिक्त पदे भरण्याबाबत

**(१७) ४४३१ (०८-०९-२०२०) श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील संचालक, सहसंचालक, उपसंचालक, अध्यक्ष, सचिव, सहसचिव, शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गट शिक्षण अधिकारी, विस्तार अधिकारी, अधीक्षक, अधीक्षक वेतन पथक यांची माहे जून, २०२० अखेर एकूण मंजूर पदे किती आहेत, त्यापैकी रिक्त पदे किती आहेत,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड (०७-१२-२०२०) :** (१) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या अखत्यारितील महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-अ व गट-ब (प्रशासन शाखा) मधील संवर्गनिहाय पुढीलप्रमाणे मंजूर पदांपैकी रिक्त पदे आहेत.

| अ.क्र. | संवर्ग/पद | मंजूर पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| १. | शिक्षण संचालक व समकक्ष गट-अ | ०७ | ०३ |
| २. | शिक्षण सहसंचालक व समकक्ष | १८ | १३ |
| ३. | शिक्षण उपसंचालक व समकक्ष गट-अ | ३५ | २६ |
| ४. | शिक्षणाधिकारी व तत्सम गट-अ | १४४ | ५७ |
| ५. | उपशिक्षणाधिकारी व तत्सम गट-ब | ६१५ | ३८९ |
| ६. | अधीक्षक गट-ब | १०१ | १७ |
| ७. | अधीक्षक गट-ब (सारासे) | ४०० | २५४ |
| ८. | विस्तार अधिकारी (शिक्षण) | १८३६ | ८०६ |

(२) रिक्त पदे भरण्यासाठी शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने त्यांच्या दिनांक २९/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांच्या नुसार सर्व संवर्गातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांवर पदोन्नती देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर वित्तीय उपाययोजना करण्यासाठी वित्त विभागाने दिनांक ०४/०५/२०२० च्या शासन निर्णयान्वये सरळसेवा भरतीच्या कार्यवाहीवर निर्बंध घातले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मत्स्य उत्पादनात वाढ होण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(१८) ४६२० (०९-०९-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशभरातील सागरी मत्स्य उत्पादनात सन २०१९ मध्ये २.१ टक्क्याची वाढ झाली असताना राज्यातील मत्स्य उत्पादन मात्र ३२ टक्क्यांनी घट झाले असल्याचे सेंट्रल मरिन फिशरीज रिसर्च इन्स्टिटयूटच्या (सीएमएफआरआय) दिनांक १ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास प्रसिध्द करण्यात आलेल्या अहवालात मांडण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील मत्स्य उत्पादनात वाढ होण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (०८-१२-२०२०) :** (१) मत्स्यव्यवसाय विभागामार्फत प्रसिध्द करण्यात येणाऱ्या आकडेवारीनुसार मत्स्य उत्पादन सन २०१८-२०१९ : ४६७२३२ मे.टन. व सन २०१९-२०२० : ४४३५९३ मे.टन आहे. सन २०१८-२०१९ च्या तुलनेत सन २०१९-२०२० मध्ये ५.०६% इतकी घट झाल्याचे दिसून येत आहे.

(२) सन २०१९-२०२० चा मासेमारी हंगामात राज्यातील मच्छिमारांना मासेमारी माहे ऑक्टोबर, २०१९ च्या दरम्यान क्यार चक्रीवादळ व माहे नोंव्हेबर, २०१९ महाचक्रीवादळ आल्याने तसेच संपूर्ण देशात मार्च, २०२० च्या सुरुवातीपासून कोरोना रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण देशात लॉकडाऊनमुळे मच्छिमारांना पूर्ण क्षमतेने मासेमारी करता आली नाही, परिणामी मागील वर्षीच्या म्हणजेच सन २०१८-२०१९ च्या तुलनेत मत्स्योत्पादनात घट झाल्याचे दिसून येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षण विभागाने इयत्ता चौथीच्या इतिहास पुस्तकातील फोटोबाबत

**(१९) ४७३९ (०८-०९-२०२०) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षण विभागाने इयत्ता चौथीतील इतिहासाच्या पुस्तकात पाठ क्रमांक ९ प्रतापगडावरील पराक्रम, पृष्ठ क्रमांक ३५ वर असलेल्या फोटोमध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज अफजलखानाला आलिंगन देताना दिसत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या अनेक वर्षांपासून शिवाजी महाराज अफजल खानाचा कोथळा बाहेर काढत असतानाचा फोटो त्याठिकाणी होता, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री छत्रपती शिवाजी महाराज अफजलखानाचा कोथळा बाहेर काढत असलेल्या वर्षानुवर्षाच्या फोटो ऐवजी श्री छत्रपती शिवाजी महाराज अफजलखानाला आलिंगन देताना चा फोटो इयत्ता चौथीतील इतिहासाच्या पुस्तकात पृष्ठ क्रमांक ३५ वर छापण्याची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड (०८-१२-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भंडारा जिल्ह्यातील संजय गांधी निराधार योजनेचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(२०) ४७५७ (२४-०८-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील संजय गांधी निराधार योजनेचे प्रस्ताव गत वर्षापासून प्रलंबित असून लॉकडाऊन काळात हजारो दिव्यांग बांधवांना अनुदान मिळाले नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२० च्या पहिल्या आठवड्यामध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा जिल्ह्यात संजय गांधी निराधार योजना समिती गठीत नसल्याने या संदर्भातील गत वर्षापासून बैठकही झाली नसल्यामुळे अपंग, वृध्द व विधवा यांना अनुदानापासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिव्यांग बांधव, अपंग, वृध्द व विधवा यांना तात्काळ अनुदान देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०२-१२-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अगरदांडा (ता.मुरुड, जि.रायगड) येथील जेट्टी व परिसर मच्छिमारांना खरेदी विक्री परवानगी मिळण्याबाबत

**(२१) ४७६५ (०९-०९-२०२०) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना विषाणू प्रादुर्भावामुळे मुंबई येथील मासळीचे मुख्य मार्केट बंद असल्याने मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील राजपुरी, दिघी, मुरुड व एकदरा येथील मच्छिमारांना मासळीची विक्री करता येत नसून मच्छिमारांचे नुकसान होत आहे, त्यामुळे अगरदांडा येथील मेरिटाईम बोर्डाची असलेली जेट्टी व

परिसर मच्छिमारांना मच्छी खरेदी व विक्री करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात वापर करण्यास परवानगी मिळण्याबाबतची मागणी येथील मच्छिमार बांधवांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीकडे दुर्लक्ष झाल्याने तेथील मच्छिमार बांधवांनी दिनांक ५ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास अगरदांडा जेट्टी परिसरात सुमारे २०० बोटी समुद्रात आणून आंदोलन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुरुड तालुक्यातील मच्छिमार बांधवांना मेरिटाईम बोर्डाची असलेली अगरदांडा येथील जेट्टी व परिसर तात्पुरत्या स्वरूपात वापरण्यास परवानगी देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (०९-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अगरदांडा येथील जेट्टी व परिसर तात्पुरत्या स्वरुपात वापरण्यास परवानगी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील मेट्रो ३ या मार्गिकेसाठी कारशेड गोरेगाव (आरे) येथून कांजुरमार्ग येथे स्थानांतर करण्याबाबत

**(२२) ४८८८ (१३-११-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.महादेव जानकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मेट्रो-३ या मार्गिकेसाठी उभारण्यात येणारे कारशेड गोरेगाव (आरे) येथून कांजुरमार्ग येथे स्थानांतर करण्यात आले असून सदर मार्गिकेच्या टनेलची ७६ टक्के कामे पूर्ण झाली असल्यामुळे कारशेडच्या स्थानांतरामुळे सदर प्रकल्प पूर्णत्वास येण्यास आणखी ४ ते ५ वर्ष तसेच ४००० कोटी रुपयांचा अतिरीक्त भुर्दंड सोसावा लागणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोरेगाव (आरे) येथील कारशेड प्रकल्पाला विरोध झाल्यानंतर त्याबाबत पर्याय सुचविण्यासाठी शासनाने स्थापन केलेल्या अतिरीक्त मुख्य सचिव श्री.मनोज सैनिक यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालानुसार नव्या कारशेडच्या जागेमुळे अधिक गुंता व आर्थिक भार वाढून पर्यावरणाचे नुकसान होणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कांजुरमार्ग येथील नव्याने निवड करण्यात आलेली जागा ही मिठागर, कांदळवण तसेच वन संरक्षित असल्यामुळे उक्त प्रकल्पास विलंब लागणार असून विलंब काळात वाहनांव्दारे होणाऱ्या कार्बन उत्सर्जनाने आर्थिक व पर्यावरणीय नुकसान गोरेगाव (आरे) येथे कारशेड केल्याने होणाऱ्या प्रदुषणापेक्षा जास्त असणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आतापर्यंत गोरेगाव (आरे) येथील मेट्रो कारशेडवर किती खर्च करण्यात आला असून कांजूरमार्ग येथील प्रस्तावित कारशेडसाठी पर्यावरणीय व अन्य परवानग्या, डीपीआर मिळून प्रत्यक्ष काम पूर्ण होण्यासाठी किती कालावधी लागणार आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गोरेगाव (आरे) कारशेड स्थानांतर रद्द करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-१२-२०२०) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) आरे दुग्ध वसाहत येथील कारशेडसाठी निश्चित करण्यात आलेल्या जागेवर पर्यावरणीय समतोल साधणे, कारशेड बांधकाम करणे व त्या परिसरातील वृक्षसंपदा जतन

करणे याबाबतचा अहवाल सादर करण्याकरीता माहे डिसेंबर, २०१९ मध्ये चार सदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी आपला अहवाल शासनास सादर केला आहे. मौजे कांजूर ता.कुर्ला येथील स.नं. २७५, न.भू.क्र. ६५७ अ मधील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना सादर केलेल्या सिमांकन नकाशामधील कांदळवनाने बाधित नसलेल्या, १०२ एकर उपलब्ध क्षेत्राचा मेट्रो मार्गिकेच्या कार डेपो, कास्टींग यार्ड तसेच अनुषंगिक वापराकरीता जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाकडील दिनांक ०१/१०/२०२० रोजीच्या आदेशान्वये आगाऊ ताबा देण्यात आलेला आहे. मुंबई मेट्रो-३ (कुलाबा-वांद्रे-सिप्झ) प्रकल्पाचे कारशेड कांजूरमार्ग येथे उभारण्याबाबत माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये जाहीर केल्यानुसार, मुंबई मेट्रो-३ व मुंबई मेट्रो-६ (स्वामी समर्थ नगर-जोगेश्वरी-विक्रोळी) या प्रकल्प मार्गिकेंचे एकत्रिकरण करण्याच्या अनुषंगाने त्याबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याची बाब मुंबई मेट्रो रेल कॉ.लि. व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यास्तरावर विचाराधीन आहे. आजपर्यंत मुंबई मेट्रो मार्ग-३ प्रकल्पांतर्गत टनेलची सुमारे ९० टक्के कामे पूर्ण झालेली आहेत. आरे कॉलनी येथील मेट्रो कारशेडच्या बांधकामावर आतापर्यंत रुपये ८५ कोटी इतका खर्च झालेला आहे. उपरोक्त डीपीआर तयार झाल्यानंतर प्रकल्प पूर्णत्व कालावधी, आर्थिक भार, पर्यावरणीय परिणाम, पर्यावरणीय व अन्य परवानग्या, इ. बाबींची स्पष्टता होईल.

---

## नागपूर शहर तसेच ग्रामीण भागात निःशुल्क धान्य वाटप योजनेत धान्याचा काळाबाजार होत असल्याबाबत

**(२३) ४९५६ (२५-११-२०२०) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहर व ग्रामीण भागात तसेच नागपूर जिल्ह्यात शासनाच्या निःशुल्क धान्य वाटपाच्या योजनेत धान्याचा काळाबाजार होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून सदरहू काळाबाजारात एफ.सी.आय, अन्न, नागरी पुरवठा विभाग व कंत्राटदाराचे संगनमत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या स्वस्त धान्य धारकांना धान्याची गरज नाही अशा धारकांचे धान्य स्वस्त धान्य दुकानदारामार्फत मोठ्या व्यापाऱ्यांना विकले जात असल्याने याबाबतची चौकशी किंवा पाहणी पुरवठा विभागाने केली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वस्त धान्य दुकानदारावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (१०-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षेच्या निकालाबाबत

**(२४) ५०२१ (२०-११-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सन १९९९ मध्ये पोलीस निरीक्षक/विक्रीकर निरीक्षक/मंत्रालय सहायक या पदासाठी परीक्षा घेऊन त्याचा निकाल दिनांक ३१ मे, २००२ रोजी म्हणजे तब्बल चार वर्षांनी जाहीर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिक्षेमध्ये ३९८ उमेदवारांच्या उत्तरपत्रिका बदलल्या गेल्याची शंका उत्पन्न होवून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने उक्त उमेदवारांचे नाव काळ्या यादीत समाविष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उमेदवारांनी परीक्षा दिल्यानंतर उत्तरपत्रिका आयोगाच्या कस्टडीत असल्यामुळे तिथे विद्यार्थी पोहोचू शकत नव्हते तसेच उत्तरपत्रिकांच्या सुरक्षेची जबाबदारी सर्वस्व आयोगाची असून परीक्षेनंतर उत्तरपत्रिका संगणकावर तपासून, स्कॅन करून पुन्हा मॅन्युअली तपासून लेखी परीक्षेचा निकाल जाहीर केल्यानंतर ही संबंधित अधिकाऱ्यांना कोणताही संशय आला नव्हता किंवा तक्रारही करण्यात आली नव्हती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आयोगाने उमेदवारांची तोंडी आणि शारीरिक चाचणी घेतल्यानंतर उत्तरपत्रिकांची छेडछाड झाल्याचे एकतर्फी ठरवून उक्त ३९८ उमेदवारांना कायमस्वरूपी काळ्या यादीत समाविष्ट केल्याची तक्रार उमेदवारांपैकी असलेले श्री.योगेश सव्वालाखे यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदन देऊन ३९८ मराठी उमेदवारांना न्याय देण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०९-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३), (४), (५) व (६) प्रस्तुत परीक्षेच्या अनुषंगाने प्राप्त तक्रारीच्या आधारे आयोगाच्या कार्यालयात करण्यात आलेल्या अंतर्गत चौकशीमध्ये लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे पात्र ठरलेल्या २७९१ उमेदवारांपैकी ३९८ उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांमध्ये विविध कारणास्तव तफावती असल्याचे दिसून आले. सबब चौकशीमध्ये गैरप्रकार करण्याचे प्रयत्न झाले असल्याची बाब निदर्शनास आली असल्यामुळे विहित पध्दतीने चौकशी करुन आयोगाने त्यांच्यास्तरावर सदर उमेदवारांना कायमस्वरुपी परीक्षांपासून प्रतिरोधीत करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच आयोगाने त्यांच्यास्तरावर सदर ३९८ उमेदवार वगळून उर्वरित निकाल दिनांक ३१ मे, २००२ रोजी जाहीर करण्यात आला. अंतर्गत चौकशीमध्ये निदर्शनास आलेल्या विविध बाबी संगनमताने करण्यात आलेले गैरकृत्य, प्रकरणाचे गांभिर्य या बाबींचा विचार करुन दिनांक २० जून, २००२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्रथम खबरी अहवाल (गु.र.क्र.३३/०२) दाखल करण्यात आला. सदर प्रकरणी गुन्हा दाखल असून प्रकरण सत्र न्यायालयामध्ये सुनावणीसाठी प्रलंबित आहे.

श्री.योगेश सव्वालाखे यांचे निवेदनाचा शोध घेतला असता ते प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. प्रसंगत: असे नमूद करण्यात येते की, भारतीय संविधानाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगास परीक्षा आयोजनाच्या अनुषंगाने स्वतंत्र अधिकार दिले असल्यामुळे त्यात शासन हस्तक्षेप करू शकत नाही.

---

## उरण (जि.रायगड) परिसरातील मच्छिमारांना मासे विक्री करण्यास परवानगी देण्याबाबत

**(२५) ५०२९ (१८-११-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी उरण परिसरातील मच्छिमारांना करंजा टर्मिनल ॲण्ड लॉजिस्टीक बंदराच्या बाजुच्या खाडीत मासळी उतरवून विक्री करण्यासाठी करंजा मच्छिमार संस्थेने परवानगी मागितली असता रायगडचे सहायक मत्स्यव्यवसाय आयुक्त यांनी अटी शर्तीवर मासे विक्रीस परवानगी दिली परंतु स्थानिक लोकप्रतिनिधींनी सदरची परवानगी बेकायदा असल्याचे सांगितल्याने उक्त परवानगीला स्थगिती देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मासे विक्रीस स्थगिती देण्यात आल्यामुळे २५०० मच्छिमारांच्या उदरनिर्वाहाची समस्या निर्माण झाली असल्याने मच्छिमारांवर उपासमारीचे संकट कोसळले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उरण परिसरातील मच्छिमारांना करंजा टर्मिनल ॲण्ड लॉजिस्टीक बंदराच्या बाजुच्या खाडीत मासळी उतरवून मासे विक्री करण्यास परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (०८-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) करंजा टर्मिनल ॲण्ड लॉजिस्टीक बंदराच्या अनुषंगाने माहिती घेतली असता सदरचे क्षेत्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO) यांच्या कार्यक्षेत्रातील असल्यामुळे सिडको प्रशासनास याबाबत अवगत करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सागरी हद्दीत मासेमारी करण्यास इतर राज्यातील मच्छिमारांना बंदी आणण्याबाबत

**(२६) ५०५५ (१८-११-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सागरी हद्दीत मासेमारीसाठी इतर राज्यासह गुजरातमधील शेकडो मासेमारी बोटी सर्रास मासेमारी करीत असल्याने राज्यातील मासेमारांना मोठा संघर्ष करावा लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील भाऊचा धक्का येथे मासेमारी व्यवसायासाठी गुजरातमधील साधारण १००० ते १५०० बोटी येत असून व ज्यावर बंदी आहे अशा धोकादायक प्रकारची ग्रुप पध्दतीची मासेमारी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इतर राज्याच्या सागरी हद्दीत मासेमारी केल्यास एक लाख रुपयांचा दंड व त्या दिवशी पकडलेल्या माशांच्या पाचपट दंड आकारण्यात येते, त्याचधर्तीवर महाराष्ट्राच्या सागरी हद्दीत इतर राज्यातील बोटींना मासेमारी करण्यास बंदी आणण्यासाठी मासेमारी प्रतिबंधक विधेयक मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्याच्या सागरी हद्दीत प्रवेश करुन मासेमारी करणाऱ्या इतर राज्यातील मच्छिमारांना मासेमारी करण्यास बंदी आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (०८-१२-२०२०) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) राज्याच्या जलधी क्षेत्रात अवैध व अनधिकृत मासेमारीस आळा घालण्याच्या दृष्टीने अनधिकृत नौकांवर कठोर कारवाई करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ कायद्यात सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) विभागाकडे असलेल्या गस्ती नौकेव्दारे समुद्रात प्रभावीपणे गस्त घालून अनधिकृत तसेच इतर राज्यातील घुसखोरी करणाऱ्या अवैध नौकांवर सागरी कायद्या अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येत असते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## साईनाथ शिक्षण संस्था व शिवनेर विद्यालय, घाटकोपर शाळांवर प्रशासक नेमण्याबाबत

**(२७) ५०७२ (१२-११-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साईनाथ शिक्षण संस्था, घाटकोपर आणि शिवनेर विद्यालय, घाटकोपर शाळांवर प्रशासक नेमणुकीची प्रक्रिया सुरू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रशासक नियुक्त न झाल्यामुळे शाळेतील शिक्षक/शिक्षकेतरांचे वेतन प्रलंबित असून निवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन, ग्रॅज्युएटी मिळाले नसल्यामुळे त्यांच्यावर आर्थिक अडचणी निर्माण होऊन उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड (२४-११-२०२०) :** (१) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), म.रा.पुणे यांच्या दिनांक २३ ऑक्टोबर, २०२० अन्वये दोन्ही शाळांवर प्रशासक नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

(३) नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शाळांमध्ये आकृतिबंधाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(२८) ५०७९ (१२-११-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील काही शाळांमध्ये एकही लिपिक अथवा शिपाई नसल्यामुळे तसेच आकृतिबंधाची अंमलबजावणी न केल्यामुळे शालेय व्यवस्थापन व शाळेचे दैनंदिन कामकाज प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना २४ वर्षे पूर्ण होऊनही वरिष्ठ वेतनश्रेणी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड (०१-१२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे. लिपिकांचा आकृतिबंध निश्चित झालेला आहे.

(२), (३) व (४) दोन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली नाही.

तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.

---

## एल.एल.बी. (तीन वर्ष) अभ्यासक्रम प्रवेशासाठी अर्ज करण्याच्या मुदतीत वाढ करण्याबाबत

**(२९) ५१४६ (१२-११-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एल.एल.बी. (तीन वर्ष) अभ्यासक्रम प्रवेशासाठी आवश्यक सीईटी परीक्षेसाठी अर्ज करण्याच्या मुदतीत वाढ करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना दिनांक २७ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागणीनुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०१-१२-२०२०) :** (१) एल.एल.बी. (तीन वर्ष) अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करण्याच्या मुदतीत वाढ करण्याबाबत वेळोवेळी प्राप्त निवेदनांच्या आधारे ४ वेळा मुदत वाढविण्यात आली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विमा कवच मिळण्याबाबत

**(३०) ५१७० (१२-११-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोविड-१९ च्या काळात कर्तव्य बजावत असताना कोरोनाचा संसर्ग झाल्याने मृत्यूमुखी पडलेल्या शिक्षकांच्या कुटुंबियांना शासनाने रुपये ५० लाखांचे विमा कवच, अनुकंपा नोकरी आणि अन्य सुविधा देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा आकडेवारीनिहाय तपशील काय आहे,

(२) असल्यास, कोरोनाग्रस्त शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्तीचा केलेला खर्च पूर्वलक्षी प्रभावाने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली, तसेच सदरहू कार्यवाहीचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विमा कवच मिळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड (०१-१२-२०२०) :** (१) असे प्रस्ताव शासनस्तरावर अद्याप अप्राप्त आहेत.

(२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, क्र. एमएजी २००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३, दिनांक १९/०३/२००५ च्या परिशिष्ट “अ” मध्ये विनिर्दिष्ट एकूण २७ आकस्मिक व ५ गंभीर आजाराच्या यादी व्यतिरिक्त इतर कुठल्याही आजारावर झालेल्या वैदयकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस “एक विशेष बाब“ म्हणून मान्यता घ्यावयाची असल्यास अशी सर्व प्रकरणे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय क्र.एमएजी-२००५/९/प्र.क्र.१/ आरोग्य-३, दिनांक १९/०३/२००५ अन्वये गठीत केलेल्या सचिव समिती समोर निर्णयार्थ सादर करण्यात येतात.

(३) या प्रकरणी वित्त विभागाने दिनांक २९ मे, २०२० रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील शाळांना निधीचे वाटप न झाल्याबाबत

**(३१) ५२५७ (१२-११-२०२०) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील जिल्हा परिषदेत शालेय पोषण आहार अभियानांतर्गत सन २०१२-२०१३ पासून गॅस सिलेंडर वाटप करण्याकरीता उपलब्ध करून दिलेला ४.७५ कोटी रुपयांचा निधी शाळांना वाटप न केल्याने जिल्ह्यातील १६१७ शाळा सदर योजनेपासून वंचित राहिल्याचे दिनांक १० जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार शाळांना सदर योजनेचा लाभ मिळण्याकरीता कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड (०९-१२-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नागपूर जिल्ह्यात एकूण २८१८ शाळा पात्र आहेत. त्यापैकी सद्य:स्थितीत १२०१ शाळांकडे गॅस कनेक्शन उपलब्ध असून १६१७ शाळांकडे गॅस कनेक्शन उपलब्ध नाही.

सन २०१५ मध्ये शालेय पोषण आहार योजनेंतर्गत गॅस सिलेंडर जोडणीसाठी जिल्हा परिषद नागपूर अंतर्गत शाळांना रुपये ४,५६,७३,०००/- इतका निधी प्राप्त झाला होता. सदर निधीपैकी रुपये ६६,६३,८९३/- इतकी रक्कम खर्च होवून रुपये ३,९०,०९,१०७/- इतकी रक्कम संबंधित शाळांनी खर्चाचे पुरावे सादर न केल्यामुळे अखर्चित राहीली आहे.

(२) गॅस कनेक्शनबाबतचा निधी विहित वेळेत खर्च न झाल्याबाबत अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नागपूर यांनी दिनांक ०२/११/२०२० रोजीच्या पत्रान्वये तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांना खुलासा सादर करण्याबाबत कळविले आहे.

तसेच, उर्वरित शाळांना गॅस जोडणी देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आय.टी.आय. मधील गट ब सेवाप्रवेश नियमाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(३२) ५३०४ (१८-११-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, अॅड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, डॉ.रणजित पाटील : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ३३७२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्‌योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आय.टी.आय. मधील निर्देशक व गट निर्देशक संवर्गावर अन्याय करणारा गट ब सेवाप्रवेश नियम सुधारीत करुन अधिसूचना होईपर्यंत या पदाच्या पदोन्नती प्रक्रियेस स्थगिती देण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब (तां) संवर्गातील सेवा प्रवेश नियम मंजूर करण्याबाबतच्या प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता त्यासाठी गठीत केलेल्या समितीच्या अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त अहवालानुसार निर्देशक व गट निर्देशक संवर्गातील गट-ब (तां) संवर्गातील सेवा प्रवेश नियमाची अंमलबजावणी करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (०९-१२-२०२०) :** (१) व २) हे खरे नाही, तथापि, महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब (तां) या संवर्गातील सेवा प्रवेश नियमात सुधारणा करण्यासाठी गठीत केलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे.

(३) गट-ब (तां) पदाच्या सुधारीत सेवाप्रवेश नियमाबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांची राहण्याची व्यवस्था रुग्णालयाजवळ करण्याबाबत

**(३४) ५३३७ (१३-११-२०२०). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयात कोविड-१९ ह्या साथीच्या काळात कोरोना बाधित कक्ष, ओ.पी.डी. येथे काम करणाऱ्या तसेच मुंबई महापालिका हद्दीबाहेर राहणा-या सर्व सवंर्गातील कर्मचाऱ्यांची राहण्याची व्यवस्था रुग्णालया शेजारील हॉटेल्स, लॉजमध्ये करुन झोपू योजनेतील पीएमची रुम सुध्दा उपलब्ध करुन देण्याबाबतच्या मागणीस मान्यता मिळाली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीला मान्यता मिळूनही त्याची अंमलबजावणी झाली नसल्याने तेथील कर्मचाऱ्यांत असंतोष निर्माण झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-१२-२०२०) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कस्तुरबा रुग्णालयातील कोविड-१९ या साथीच्या काळात कोरोनाबाधित कक्ष, ओ.पी.डी. येथे काम करणाऱ्या तसेच महापालिका हद्दीबाहेर राहणाऱ्या सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांची राहण्याची व्यवस्था करण्याच्या मागणीस मान्यता मिळाली होती, हे खरे आहे.

(२) व (३) कस्तुरबा रुग्णालयातील डॉक्टर्स व परिचारीकांची राहण्याची व्यवस्था उच्च प्रतीच्या हॉटेलमध्ये करण्यात आली होती.

तसेच, हॉटेलमध्ये राहण्यास अनुत्सुक असलेल्या सदर रुग्णालयातील परिचारीकांची व्यवस्था कस्तुरबा रुग्णालयाच्या आवारातील नर्सेस क्वार्टसमध्ये करण्यात आली होती.

सदर रुग्णालयातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची राहण्याची व्यवस्था महानगरपालिकेच्या “ई” विभागातील सावित्रीबाई फुले महापालिका शाळा व भायखळा पश्चिम महापालिका शाळेत करण्यात आली होती. तथापि, सदर व्यवस्था कामगारांना मान्य नसल्याने त्यांची राहण्याची व्यवस्था कस्तुरबा रुग्णालयाच्या अखत्यारीतील सेवा निवासस्थानात करण्यात आली होती.

सदर रुग्णालयातील कर्मचाऱ्यांची त्यांच्या राहण्याच्या व्यवस्थेबाबतची कोणतीही तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाली असून, अद्यापि काही कर्मचारी कस्तुरबा रुग्णालयाच्या अखत्यारीतील सेवा निवासस्थानात राहत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना करण्याबाबत

**(३४) ५३९६ (१२-११-२०२०) श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे मे ते ऑक्टोबर, २०२० या ६ महिन्यांच्या काळात बलात्कार, लैंगिक अत्याचार, विनयभंग या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असून राज्यात महिलावरील बलात्कार, हत्या, महिलांना विविध

कारणांनी आत्महत्येस प्रवृत्त करणे अशा अनेक गुन्ह्याबाबत महाराष्ट्र अव्वल असल्याचे एनसीआरबीने दिलेल्या अहवालात निदर्शनास आले आहे, मागील अडीच वर्षात नवी मुंबईसह पनवेल, उरणमध्ये बलात्कांराच्या ३७८ घटना घडल्या असून त्यामध्ये अल्पवयीन मुलींचाही समावेश आहे, तसेच नेरुळ येथे १४ वर्षीय मुलीवर बलात्कार झाल्याने अल्पवयीन मुलगी गरोदर झाल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमरगा (जि.उस्मानाबाद) येथील वीटभट्टीवरील मजुर महिलेवर झालेल्या अत्याचार प्रकरणी विशेष तपास पथक स्थापन करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूरसह राज्यात अनेक ठिकाणी महिला अत्याचाराच्या निषेधार्थ आंदोलने करण्यात आली असून गेल्या सहा महिन्यात महिला विरोधी गुन्हे संबंधित किती खटले आजवर राज्यात प्रलंबित आहेत, महिला विरोधी गुन्ह्याशी संबंधित प्रलंबित खटले तात्काळ मार्गी लावणे संदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही केली आहे, तसेच, राज्यात महिलांसाठी प्रत्येक जिल्ह्यात आणि पोलीस आयुक्तालयाच्या ४८ घटकांमध्ये स्वतंत्र विशेष न्यायालये स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, महिलांवरील अत्याचार थांबविणे तसेच महिला आणि मुलींना निर्भयपणे वावरता यावे, यासाठी बलात्काऱ्यांना २१ दिवसात फाशीची शिक्षा ठोठावण्याच्या तरतुदीसह कडक शिक्षा असलेल्या आंध्र प्रदेश राज्यातील “दिशा” सारखा कायदा करण्याच्या राज्य शासनाच्या विचाराधीन असलेल्या बाबीवर निर्णय घेण्यात आला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात दिशा कायदा लागू करण्याबाबत तसेच महिलांवर अत्याचार करणाऱ्यांवर कडक कारवाई करुन महिला सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (०९-१२-२०२०) :** (१) राज्यात बलात्कार, विनयभंग व लैंगिक अत्याचाराचे माहे मे ते ऑक्टोबर, २०२० या कालावधीत एकूण ८१४१ गुन्हे दाखल असून, माहे मे ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत ९७०७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. माहे मे ते ऑक्टोबर या कालावधीत सन २०१९ च्या तुलनेत सन २०२० मध्ये दाखल गुन्ह्यांच्या संख्येत १५६६ ची घट झालेली आहे.

एनसीआरबी अहवाल, २०१९ अनुसार राज्यात सन २०१९ मध्ये महिलांवरील बलात्काराचे २२९९ गुन्हे दाखल असून बलात्काराच्या दाखल गुन्ह्यांच्या संख्येत राजस्थान प्रथम क्रमांकावर असून, याबाबत राज्याचा चौथा क्रमांक आहे. तसेच महिलांना आत्महत्येस प्रवृत्त करणे याबाबत सन २०१९ मध्ये राज्यात सर्वाधिक ८०२ गुन्हे दाखल असून, क्राईम रेटनुसार राज्य पाचव्या क्रमांकावर आहे.

नेरूळ येथे अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचार प्रकरणी भा.दं.वि.सं. कलम ३७६(३), ५०४, ५०६(२), ३४ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ५(जे)(२) अन्वये गु.र.क्र. २३९/२०२० दाखल करण्यात आला असून, प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

(२) होय.

(३) केंद्र शासनाच्या “National Mission for Safety of Women” योजनेंतर्गत महिला व बालक अंतर्भूत असलेली बलात्कार व पॉक्सो कायद्यांतर्गतची प्रलंबित प्रकरणे चालवून त्वरीत निकाली काढण्याकरीता राज्यात १ वर्षाच्या कालावधीकरीता १३८ विशेष जलदगती न्यायालये स्थापन करण्यास दिनांक ०४/०३/२०२० रोजी शासन मान्यता देण्यात आली आहे.

(४) व (५) महिला व बालकांवरील अत्याचारास प्रतिबंध घालण्यासाठी राज्यात नविन कायदा करण्याची कार्यवाही सुरू आहे. या अंतर्गत अत्याचार करणाऱ्यांना लवकरात लवकर आणि कठोर शिक्षा व्हावी यासाठी तरतूद करण्याचे प्रस्तावित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्हयामधील मच्छिमारांना मदत देण्याबाबत

**(३५) ५४३६ (१८-११-२०२०) श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यामध्ये तेल आणि नैसर्गिक वायू महामंडळ (ONGC) यांच्यामार्फत समुद्रामध्ये तेल संशोधनाकरीता पश्चिम किनाऱ्यावर १० मार्च ते ५ मे असे ५६ दिवस चालणारा सेस्मिक सर्व्हे दरम्यान पालघर जिल्हयातील मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवांना बंदीच्या कालावधीमध्ये शासन नुकसान भरपाई देणार आहे काय,

(२) असल्यास, ह्यापूर्वी ओएनजीसीमार्फत किती वेळा पालघर जिल्हयात सेस्मिक सर्व्हे करण्यात आला आहे,

(३) असल्यास, मच्छिमार बांधवाचे होळीनंतर मासेमारीसाठी अनुकूल वातावरण तयार होत असताना, ओएनजीसीव्दारे हा सर्व्हे लादला जात आहे त्यामुळे मच्छिमार बांधव पुन्हा आर्थिक संकटात सापडला जाणार असल्याने शासन त्यांना विशेष पॅकेज देणार आहेत काय,

(४) असल्यास, सेस्मिक सर्व्हे होत असताना शासनाने मच्छिमारांचे किती नुकसान होणार आहे यासाठी सीएमएफआरआयमार्फत चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पालघर जिल्हयामधील मच्छिमारांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (०८-१२-२०२०) :** (१), (२), (३), (४) व (५) ओ.एन.जी.सी. तेल कंपनीचे समुद्रात होणारे सेस्मिक सर्वेक्षणामुळे मच्छिमारांचे होणारे नुकसान व मच्छिमारांच्या समस्याबाबत तोडगा काढण्यासाठी वेळोवेळी बैठका झाल्या आहेत. सेस्मिक सर्वेक्षणामुळे मच्छिमारांच्या मासेमारीवर होणाऱ्या परिणामुळे मच्छिमारांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी केंद्रीय समुद्री मत्स्यकी अनुसंधान संस्थान यांचेमार्फत ओ.एन.जी.सी. सेस्मिक सर्वेक्षणामुळे

बाधित होणारे मासेमारी क्षेत्र, मासेमारी नौका इत्यादीबाबतच्या अभ्यास करण्यासाठी CMFRI व ONGC कंपनी यांचेमध्ये करार करण्यात आलेला आहे. सदरच्या अभ्यास अहवालावरून प्राप्त होणाऱ्या माहितीच्या आधारे मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याबाबतची कार्यवाही केंद्र शासनाच्या अखत्यारीतील ओ.एन.जी.सी. मार्फत होणार आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात मच्छिमार बांधवांसाठी किसान क्रेडिट कार्ड योजना राबविण्याबाबत

**(३६) ५४३७ (१८-११-२०२०) श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशांतर्गत मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवांसाठी केंद्र शासनाने किसान क्रेडिट कार्ड योजना लागू केली असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मत्स्य विभागाने सुध्दा किसान क्रेडिट कार्डचा लाभ दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात मच्छिमार बांधवांसाठी किसान क्रेडिट कार्ड योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (०८-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर योजनेची अंमलबजावणी सुरु असून, ३१४७ मच्छिमारांना किसान क्रेडिट कार्ड राज्यातील विविध बँकामार्फत वितरित करण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला शहर (जि.अकोला) येथील स्थानिक विमानतळाकरीता भूमी अधिग्रहण करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(३७) ५४६५ (२०-११-२०२०) डॉ.रणजित पाटील : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ३५३८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहर (जि.अकोला) येथील स्थानिक विमानतळाकरीता भूमी अधिग्रहण करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा अधिकारी, अकोला यांनी शासनाकडे सादर केल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाने कळविले आहे की, ATR-४२ प्रकारची विमानसेवा सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत DGCA च्या परवान्यानुसार सुरु होऊ शकेल मात्र याच्यापेक्षा मोठ्या प्रकारच्या विमानांकरीता अतिरीक्त २२.२४ हे.आर. जमीन संपादन करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने विमानतळाकरीता आवश्यक अतिरीक्त २२.२४ हे. आर जागेचे भूसंपादन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०९-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) संयुक्त मोजणीअंती सदर विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी सुमारे २२.२४ हे. आर जमिनीची आवश्यकता असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर जमिनीच्या भूसंपादनापूर्वी प्रथमत: त्याबाबतचा व्यवहार्यता अहवाल तयार करुन शासनास सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस देण्यात आलेल्या आहेत. अकोला विमानतळ हे भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्या अखत्यारित असल्याने सदर विमानतळाच्या

व्यवहार्यतेबाबतचा अभ्यास अहवाल भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी करावे असे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे पाचपाखाडी (ता.जि.ठाणे) येथील शेत जमीन रेमंड कंपनीला बेकायदेशीररित्या देण्यात आल्याबाबत

**(३८) ५५२७ (२०-११-२०२०) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पाचपाखाडी (ता.जि.ठाणे) येथील सर्वे नं. १२७, १२८/ब आणि १२९/१ अशा एकूण १२.५० एकर शेत जमिनीवर आदिवासींची संरक्षित कुळकायद्याचे अधिकार असताना ठाणे महानगरपालिका आदेश क्र.व्ही.पी.नं. ५०४/००१६/०९/टीएमसी/टीडीडी/३०२८/१९, दिनांक २७ मार्च, २०१९ अन्वये रेमंड कंपनीला बेकायदेशीररित्या इमारतीचे बांधकाम सुरु करण्याचे आदेश दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेमंड कंपनीस बेकायदेशीररित्या बांधकाम करण्यास परवानगी दिल्यामुळे कुळ बाधितांनी बांधकाम परवानगीचे आदेश रद्द करण्याबाबत दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० रोजी आयुक्त, ठाणे महानगरपालिकेला निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बांधकाम परवानगीचे आदेश रद्द करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

संरक्षित कुळाबाबत श्री.यशवंत रामा तारवी व इतर यांनी दाखल केलेला अर्ज तहसिलदार ठाणे यांनी दिनांक १२/०८/२०११ रोजी निकाली काढला असून सदर आदेश उपविभागीय अधिकारी व महाराष्ट्र महसूल

ट्रिब्युनल (एम.आर.टी.) यांनी कायम केले आहेत. त्यानुसार ठाणे महानगरपालिकेने बांधकाम परवानगी दिली आहे. सद्य:स्थितीत श्री.यशवंत रामा तारवी व इतर यांचा याबाबतीत दिवाणी दावा क्रमांक ९९७/२०१९ मा.न्यायालयात प्रलंबित आहे.

(२) ठाणे महानगरपालिकेच्या अहवालानुसार सदर निवेदन ठाणे महानगरपालिकेस प्राप्त झाले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरोना महामारीमुळे कोकणातील पर्यटन व्यावसायिकांचे नुकसान झाल्याबाबत

**(३९) ५६४० (१२-११-२०२०) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे लॉकडाऊनमध्ये कोकण किनारपट्टीवरील हॉटेल व्यवसायासह छोटे व्यवसाय माहे मार्च, २०२० पासून सुमारे ६ महिन्यांपासून बंद होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे व पालघर इत्यादी जिल्हयात लॉकडाऊनमुळे बंद असलेल्या सर्व मोठ्या व छोट्या व्यावसायिकांचे सुमारे ७०० कोटींचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोकणातील सर्व मोठे व छोटे पर्यटन व्यवसाय पुन्हा सुरु करण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०१-१२-२०२०) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे. तथापि, नुकसानीसंदर्भात मूल्यांकन करण्यात आलेले नाही.

(३) पर्यटन व्यवसायास पुनरुज्जीवित करण्यासाठी राज्यातील हॉटेल्स, रिसॉर्टस्, होम-स्टे, निवास व न्याहारी सुरु करण्यासाठी दिनांक ८/९/२०२० रोजी तर उपाहारगृहे सुरु करण्यासाठी दिनांक ३/१०/२०२० रोजी मानक कार्यप्रणाली निर्गमित करण्यात आली आहे. राज्यांतर्गत टुर्स सुरु करण्यासाठी दिनांक ७/१०/२०२० रोजी टुर ऑपरेटर्सकरीता मानक कार्यप्रणाली निर्गमित करण्यात आली आहे.

राज्यात आदरातिथ्य उद्योग सुरु करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रक्रियेमध्ये सुलभता आणण्याकरीता पर्यटन विभाग, शासन निर्णय, दिनांक २/११/२०२० अन्वये यापुढे फक्त १० परवानग्या/परवाने/ना-हरकत प्रमाणपत्रे आणि ९ स्वयं प्रमाणपत्रे आवश्यक करण्यात आली आहेत.

तसेच केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे नोंदणीकृत असलेल्या हॉटेल व्यावसायिकांकडून दिनांक १/४/२०२१ पासून वीज दर, वीज शुल्क, पाणी पट्टी, मालमत्ता कर, विकास कर, वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक व अकृषिक कराची आकारणी औद्योगिक दराने करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील समुद्रकिनाऱ्यांस भेट देणाऱ्या पर्यटकांना विश्रांती, आहार तसेच सार्वजनिक प्रसाधनगृहे, स्नानगृहे इ. सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने पर्यटन विभाग, शासन निर्णय, दिनांक १७/८/२०२० अन्वये राज्याचे 'बीच शॅक्स' धोरण जाहीर करण्यात आले आहे. तसेच शासन निर्णय, दिनांक २८/९/२०२० अन्वये राज्याचे 'कृषी पर्यटन' धोरण जाहीर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राबविण्यात येणाऱ्या शासकीय पद भरती प्रक्रियेबाबत

**(४०) ५६६० (२०-११-२०२०) श्री.जयंत पाटील** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) पुढील वर्षीच्या भरती प्रक्रिया राबविण्यासाठी शासनाच्या विविध विभागांकडून रिक्त पदांची माहिती एमपीएससीला अद्याप देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या भरती प्रक्रियेसाठी दरवर्षी जुलैमध्ये लोकसेवा आयोगातर्फे विविध विभागांकडून रिक्त पदांची मागविलेली माहिती मिळाल्यानंतर परीक्षांचे वेळापत्रक नोव्हेंबरमध्ये तयार केले जाते व डिसेंबरमध्ये जाहिरात प्रसिध्द केली जाते परंतु सदर माहिती एमपीएससीकडे प्राप्त झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील आरक्षणाचा प्रश्न, पद भरती बंदीचा निर्णय इ. कारणांमुळे पुढील वर्षी भरती प्रक्रिया होणार की नाही असा प्रश्न राज्यभरातील लाखो उमेदवारांना पडला असल्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला शासनाच्या विविध विभागांकडून रिक्त पदांची माहिती सादर करुन शासकीय पद भरती बंदी उठविण्याचा निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर पद भरती बंदी उठविण्याकरीता किती कालावधीत लागणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०९-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) राज्यात कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावास आळा घालण्यासाठी लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षात महसूलावर मोठ्या प्रमाणात झालेली घट विचारात घेवून राज्याच्या अर्थव्यवस्थेवरील होणारे विपरीत परीणाम रोखण्यासाठी करावयाच्या विविध उपाययोजनांचा भाग म्हणून शासकीय अधिकारी कर्मचारी यांच्या भरतीवर बंदी घालण्याचा निर्णय दिनांक ४/०५/२०२० च्या शासन निर्णयाव्दारे घेण्यात आला आहे. त्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविल्या जाणाऱ्या मागणीपत्रांची संख्या कमी झाली आहे. राज्यातील कोविडजन्य परीस्थिती आटोक्यात आल्यास व अपेक्षित महसूल राज्यास प्राप्त झाल्यावर योग्यवेळी पदभरतीवरील निर्बंध मागे घेण्याच्या विचार करता येईल.

मराठा आरक्षणासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरून तसेच कोविडजन्य परिस्थितीतील सुधारणा विचारात घेवून पदभरतीवरील निर्बंध शिथिल झाल्यास पदभरतीच्या अनुषंगाने योग्य तो निर्णय शासनामार्फत घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाज्योती संस्थेतील पदे भरण्याबाबत

**(४१) ५८२३ (२३-११-२०२०) श्री.राजेश राठोड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ओबीसी, एसबीसी, व्हीजेएनटी विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परिक्षांच्या तयारीसाठी आणि परदेशात उच्च शिक्षणासाठी मदत व्हावी म्हणून महाज्योती या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाज्योतीचे काम पुरेशा मनुष्यबळाअभावी धिम्यागतीने सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महाज्योतीमध्ये पुरेसे अधिकारी व कर्मचारी यांची त्वरीत नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०९-१२-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

महाज्योती संस्थेमार्फत ओबीसी, एसबीसी, व्हीजेएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परिक्षांच्या तयारीसाठी मदत म्हणून महाज्योती संस्था स्थापन करण्यात आली आहे. महाज्योती संस्थेकडून परदेशी उच्च शिक्षणासाठीची योजना राबविण्यात येत नाही.

(२), (३) व (४) उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेनुसार इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या, शासन निर्णय, क्र.महाज्यो २०२०/प्र.क्र.५६/ महामंडळे, दिनांक ०५/०८/२०२० अन्वये ३ नियमित पदे व बाह्य यंत्रणेव्दारे १७ पदे अशा एकूण २० पदांच्या आकृतिबंधास मान्यता दिली आहे. सद्य:स्थितीत आकृतिबंधातील नियमित दोन पदांवर (व्यवस्थापकीय संचालक व मुख्य लेखा व वित्त अधिकारी) अधिकारी कार्यरत आहेत. मंजूर आकृतिबंधातील उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## जिवाचीवाडी (ता.केज, जि.बीड) येथील ग्रामपंचायतीमधील तत्कालीन सरपंच व ग्रामसेवकांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(४२) ५८५४ (१४-११-२०२०) श्री.संजय दौंड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिवाचीवाडी (ता.केज, जि.बीड) येथील ग्रामपंचायतीमध्ये सन २०१८-२०१९ या कालावधीत चौदाव्या वित्त आयोगाच्या निधीतून विविध योजना राबवून तत्कालीन सरपंच व ग्रामसेवकांनी लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहाराची चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई करावी अशी मागणी तेथील ग्रामस्थांनी संबंधित गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०७-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे,

जिवाचीवाडी (ता.केज, जि.बीड) येथिल ग्रामपंचायतीमध्ये सन २०१८-२०१९ या कालावधीत चौदाव्या वित्त आयोगाच्या निधीतून विविध योजना राबविण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, चौकशी करण्यात आली आहे. सदर प्रकरणात दोषी ग्रामविकास अधिकारी यांना निलंबित करण्यात येऊन विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(४३) ५९३४ (२३-११-२०२०) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी आर. विमला यांनी प्रशासकीय व वित्तीय अधिकार नसताना मर्जितील संस्थांना कोट्यवधी निधीचा वाटप करून गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने विमला यांच्यावर आरोप केला असल्याने या प्रकरणी श्री.प्रविण जैन, उपसचिव, ग्रामविकास विभाग यांच्या चौकशी समितीने चौकशी अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(३) असल्यास, चौकशी अहवालानुसार शासनाने दोषी अधिकाऱ्यांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०८-१२-२०२०) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) या कार्यालयाची वित्तीय बाबी संदर्भातील निर्णय व अनुषंगिक बाबींची तपासणी करण्याकरीता दिनांक २६/०८/२०२० च्या शासन आदेशान्वये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) या कार्यालयाची तपासणी करुन अहवाल शासनास सादर केला असून पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कनेरसर (ता.खेड, जि.पुणे) येथील जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीचे बांधकाम करण्याबाबत

**(४४) ५९७१ (२३-११-२०२०) श्री.विजय उर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कनेरसर (ता.खेड, जि.पुणे) येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत धोकादायक असल्याचे जिल्हा प्रशासनाने लेखी अहवालात मान्य केले असताना शाळेच्या इमारतीचे बांधकामास सुरुवात केली नसल्यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक १९ फेब्रुवारी व २९ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शाळेच्या इमारतीचे बांधकाम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१०-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर शाळेस ४ शिक्षकांची पदे मंजूर असून त्यानुसार ४ वर्गखोल्यांची आवश्यकता आहे. जिल्हा नियोजन समितीकडे सन २०२०-२०२१ मध्ये नविन ४ वर्गखोल्या बांधकामासाठी रुपये ३४.०० लक्ष इतक्या निधीची मागणी करण्यात आली आहे.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## नागपूर महानगरपालिकेला शासनाने मंजूर केलेल्या निधीची रक्कम अप्राप्त असल्याबाबत

**(४५) ६०७३ (२०-११-२०२०) श्री.प्रवीण दटके, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेला शासनाने शासन निर्णय, क्र. मनपा-२०१९ /प्र.क्र.११४/नवि-१६, दिनांक ३/९/२०१९ लेखाशीर्ष २२१७०९१३ अन्वये रुपये १४९.९ कोटी रक्कमेचे कार्यादेश निर्गमित करण्यात आले असूनही उक्त

निर्णयाप्रमाणे देऊ केलेली रक्कम महानगरपालिकेस वर्ग करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निधी अप्राप्त असल्यामुळे नागरिकांना मूलभूत सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याकारणास्तव उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू निधी प्रलंबित ठेवणाऱ्या/निधीचा गैरव्यवहार करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-१२-२०२०) :** (१), (२) व (३) महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोई सुविधांचा विकास या योजनेंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या रुपये १५७.५० कोटीच्या विकास कामांना तत्कालीन परिस्थितीनुसार शासन निर्णय, क्र. मनपा-२०१९/प्र.क्र.११४/नवि-१६, दिनांक ०३ सप्टेंबर, २०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे.

प्रस्तुत कामांकरीता नागपूर महानगरपालिका या कार्यान्वयन यंत्रणेने कार्यादेश दिल्याबाबत अहवाल सादर केला आहे.

सदर कामांकरीता सन २०१९-२०२० मध्ये निधी वितरित होऊ शकला नाही, ही वस्तुस्थिती आहे.

सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत निधी, प्रत्यक्ष वितरणासाठी उपलब्ध होणारा निधी व मागण्या यांच्या अधीनतेने निधी वितरणाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे शेततळयांचे प्रलंबित अनुदान देण्याबाबत

**(४६) ६१०४ (२०-११-२०२०) श्री.प्रशांत परिचारक, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तत्कालीन शासनाने शेतकऱ्यांसाठी राबविलेल्या "मागेल त्याला शेततळे" या योजनेतून शेतकऱ्यांना मिळणारे अनुदान शासनाकडून बंद झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास या योजनेतून सोलापूर जिल्ह्यातील ३३७४ शेतकऱ्यांच्या शेत तळ्यांचे रुपये १६ कोटींचे अनुदान शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेत तळ्यांच्या अनुदानासाठी आवश्यक असलेली सर्व प्रक्रिया पूर्ण करुन देखील अनुदान मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यावर्षी अतिवृष्टीमुळे आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत निर्णय घेऊन शेतकऱ्यांचे शेत तळ्यांचे प्रलंबित अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (०९-१२-२०२०) :** (१), (२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे.

(४) अनुदान देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे कोडोली (ता.जि.सातारा) ग्रामपंचायतीचे सरपंच व उपसरपंच यांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(४७) ६११६ (०१-१२-२०२०) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोडोली (ता.जि.सातारा) ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व अन्य दोन सदस्यांनी आर्थिक गैरव्यवहार व अन्य प्रकरणी दोषी ठरवून विभागीय आयुक्त, पुणे यांनी दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या आदेशानुसार आदेशाच्या दिनांकापासून पुढील ६ वर्षे निवडणूक लढविण्यास अपात्र ठरविल्याचे आदेशित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोषी ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी विभागीय आयुक्तांच्या आदेशाविरुध्द मा.ग्रामविकास मंत्री महोदयांकडे अपील दाखल केले असता मा.ग्रामविकास मंत्र्यांनी दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या आदेशास स्थगिती देऊन ग्रामपंचायतीनी कोणतेही आर्थिक व धोरणात्मक निर्णय घेऊ नयेत असे सुधारीत आदेश त्याचवेळी देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.ग्रामविकास मंत्री यांनी दिलेले आदेश रद्द करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मौजे कोडोली ग्रामपंचायतीची मुदत दिनांक ९ नोव्हेंबर, २०२० रोजी समाप्त होत असल्यामुळे विभागीय आयुक्त, पुणे यांचे आदेश कायम करण्यात येऊन या ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना निवडणूक लढविण्यास अपात्र ठरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०४-१२-२०२०) :** (१) होय.

(२) नाही. तथापि, सदर प्रकरणी दिनांक ०६/०३/२०२० रोजी स्थगिती देण्यात आली होती व दिनांक ११/०३/२०२० रोजी सरपंच व उपसरपंच यांच्याबाबत सुनावणी पूर्ण होईपर्यंत बैठकीमध्ये आर्थिक व धोरणात्मक निर्णय घेता येणार नाहीत, असे मा.मंत्री (ग्रामविकास) यांनी आदेश दिले आहेत.

(३) होय, दिनांक १४/१०/२०२० रोजी "कामकाज चालु राहण्याच्यादृष्टीने आर्थिक व धोरणात्मक निर्बंध उठविणेत येत आहे," असे मा.मंत्री(ग्रामविकास) यांनी आदेशित केले आहे.

(४) सदर प्रकरण हे अर्ध-न्यायिक (Quasi-Judicial) प्रकरण असून मा.मंत्री महोदयांना याबाबत सुनावणी घेण्याचे आणि निर्णय पारित करण्याचे अधिकार आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अलिबाग (जि.रायगड) नगरपरिषद हद्दीतील अलिबाग कोळीवाडा जेट्टीपर्यंत नवीन बाह्य रस्ता तयार करण्याबाबत

**(४८) ४६५७५ (०६-०७-२०१९) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) नगरपरिषद हद्दीतील अलिबाग कोळीवाडा मच्छिमार जेट्टीवर मासे विक्री होत असून सदर माश्यांची वाहतूक मोठ्या वाहनाव्दारे करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मासे वाहतूक करणाऱ्या गाड्यांची वाहतूक ही शहरीवस्ती असलेल्या अपूऱ्या रस्त्यामधून करावी लागत असल्यामुळे अलिबाग नगरपरिषदेच्या स्मशानभूमीपासून ते अलिबाग कोळीवाडा मच्छिमार जेट्टीपर्यंत नवीन बाह्य मार्ग बनविण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर ठिकाणी नवीन बाह्य रस्ता बनविण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-१२-२०२०) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) अलिबाग नगरपरिषद हद्दीतील वाहतूक व्यवस्था विचारात घेऊन अलिबाग शहर विकास आराखड्यामध्ये १८ मीटर रुंदीचा नवीन बाह्यरस्ता प्रस्तावित केला असल्याचे अलिबाग नगरपरिषदेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी येथील जिल्हा रुग्णालयातील सुरक्षारक्षकांना कामावरुन कमी करण्यात आल्याबाबत

**(४९) ४७३०७ (०५-०७-२०१९) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील जिल्हा रुग्णालयात पुरेसे सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने तसेच रुग्णालयात योग्य सुरक्षा नसतानाही गेल्या सहा महिन्यांपासून कार्यरत असलेल्या २३ सुरक्षारक्षकांना कामावरुन कमी करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयात परजिल्ह्यातील रुग्ण उपचारासाठी दररोज येत असल्याने सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२९-१०-२०२०) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय येथे एकूण ३० सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले आहेत. महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. (मेस्को), पुणे या संस्थेची देयकाची रक्कम प्रलंबित असल्यामुळे, सदर संस्थेने कोणत्याही प्रकारची लेखी सूचना न देता दिनांक ०१/११/२०१८ पासून सुरक्षा सेवा बंद केली होती. त्यानंतर दिनांक ११/०४/२०१९ पासून १४ सुरक्षारक्षक कार्यरत आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील साडेसात हजार शाळांचे प्रस्ताव फेटाळण्यात आल्याबाबत

**(५०) ५००९६ (०५-०७-२०१४) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागातील व राज्यातील शिक्षणाचा अधिकार कायदा २०१० अंतर्गत सन २०१३-२०१४ व २०१४-२०१५ साठी अनेक शैक्षणिक संस्थांनी सादर केलेले नवीन शाळा मान्यतेचे साडेसात हजार प्रस्ताव फेटाळण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मुस्लीम ऑर्गनायझेशन फॉर व्हुमन डेव्हलपमेंट, नागपूर या संस्थेच्यावतीने मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल याचिकेवर राज्याचे शिक्षण सचिव व नागपूर विभागाचे शिक्षण उपसंचालक यांना नोटीस बजावून दिनांक २४ एप्रिल, २०१४ पर्यंत बाजू मांडण्याचे निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रस्ताव फेटाळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड (१७-१२-२०२०) :** (१) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या संस्थांना नवीन शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

(२) मुस्लीम ऑर्गनायझेशन फॉर व्हुमन डेव्हलपमेंट, नागपूर या संस्थेच्यावतीने मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालयाने, नागपूर खंडपीठ येथे दाखल याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना शाळा सुरु करण्याकरीता नव्याने अर्ज दाखल करण्याची मुभा देऊन सदर याचिका निकाली काढल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **श्री.राजेंद्र भागवत**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.